# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/७६/२०१४-१५/२५८ दिनांक : ११.१२.२०१४

## आदेश केस क्र. ७६/१४-१५

१) श्री. बाळू पांडुरंग बेंगडे,
रा. बेंगडेवाडी (मेणी)
ता. शिराळा, जिल्हा - सांगली
- अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, शिराळा

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री.जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाळू पांडुरंग बेंगडे, रा. बेंगडेवाडी (मेणी) ता. शिराळा यांनी त्यांना शेतीपंप वीज देयकाचे रुपांतर औद्योगिक वीज देयकामध्ये केल्याबाबतचा तक्रार अर्ज कोल्हापूर मंच येथे दि. २९.१०.२०१४ रोजी दाखल केला.

<u>तक्रारीचे स्वरुप</u>

सदर ग्राहकास सर्व्हे नं. ४४/३ मध्ये बोअरवर ३ अश्वशक्तीचे कनेक्शन दि. ०४.०४.२०१३ रोजी देण्यात आले. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार त्यांना कृषिपंपासाठी वीज जोडणी दिली होती. त्याचा ग्राहक क्र. २७३९८००००५३६ असा आहे. त्यानुसार त्यांना शेतीपंपाप्रमाणे वीज आकारणी होत होती. सोबत सप्टेंबर २०१३ चे वीज देयक जोडले आहे. परंतु उप विभाग शिराळा कार्यालय यांनी कोणतीही तपासणी अथवा चौकशी न करता सदर कृषि वीज जोडणीचे रुपांतर औद्योगिकमध्ये केले आहे व औद्योगिक वीज वापरानुसार वीज देयके दिली जात आहेत. सोबत औद्योगिकनुसार वीज आकारणी झालेचे एप्रिल २०१४ चे वीज देयक जोडले आहे. विजेचा वापर हा फक्त शेतीसाठीच आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष जागेवर पहाणी करुन वीज देयक कृषिपंपानुसार देण्यात यावे व आतापर्यंत औद्योगिक देयकानुसार केलेली जादा आकारणी दुरुस्त करण्यात यावी. मंचाकडे तक्रार करण्यापूर्वी ग्राहकाने उप कार्यकारी अभियंता शिराळा यांचेकडे दि. १५.०४.२०१४ रोजी तसेच दि. १९.०५.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे बील दुरुस्तीसाठी अर्ज केला होता.

सांगली कक्षाने दि. ०४.०७.२०१४ रोजी आदेश दिला होता. आदेशाप्रमाणे ग्राहकाच्या जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन वीज वापर नक्की कोणत्या कारणासाठी होत आहे याची शहानिशा करुन त्याप्रमाणे वीज दर बदलण्याची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच कार्यकारी अभियंता इस्लामपूर विभाग यांनी ग्राहकाने कोणत्या कारणासाठी ए-१ फॉर्म सादर केला होता त्याची शहानिशा करावी व त्यामध्ये जर गैरव्यवहार आढळल्यास, संबंधितावर योग्य ती कारवाई करावी तसेच या बाबत ग्राहकाची फसवणूक झाल्याचे आढळून आल्यास, दोषी अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी.

सदर तक्रारीची सुनावणी कोल्हापूर येथे दि. २०.११.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे श्री. सी.जी. जाधव, शाखा अधिकारी, पणुंब्रे व श्री. आर.आर. श्रीनाथ, सहाय्यक अभियंता, गुणवत्ता नियंत्रण, शिराळा हे हजर होते. तत्पूर्वी त्यांचे लेखी निवेदन मंचासमोर हजर केले. श्री. बेंगडे यांनी दि. १५.०१.२०१३ रोजी ३ अश्वशक्ती बोअरवरील कनेक्शनसाठी मागणी अर्ज शिराळा कार्यालयास सादर केला होता, त्यामध्ये खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी असा उल्लेख केला होता. सदर अर्जावर शाखा अधिकारी पणुंब्रे यांनी पहाणी करुन दि. २०.०२.२०१३ रोजी अंदाजपत्रक सादर केले. सदर प्रस्तावामध्ये Ind/Private Drinking Water Scheme असा उल्लेख दिसून येतो. सदर प्रस्तावास उप विभागाने दि.२६.०२.२०१३ रोजी मंजुरी दिली. ग्राहकाने त्यांना "खाजगी पाणी पुरवठा"अंतर्गत दि. २७.०२.२०१३ रोजी रु. ३१९०/- चे चलन देण्यात आले असून त्याचा भरणा ग्राहकाने दि. ३१.०३.२०१३ रोजी केला. चाचणी अहवाल स्वीकारुन ग्राहकास दि. १३.०४.२०१३ रोजी विद्युत पुरवठा करण्यात आला.

ग्राहकास प्रथम बील सप्टेंबर २०१३ मध्ये शेतीपंप दरसंकेतानुसार नजरचुकीने देणेत आलेचे दिसून येते. सदर ग्राहकाची वर्गवारी कनिष्ठ अभियंता, पणुंब्रे (वा) यांचे पत्र क्र. १६० ने दि. १३.१२.२०१३ नुसार औद्योगिक (खाजगी पाणी पुरवठा) दराने वीज बील आकारणी केली आहे. ग्राहकाने सप्टेंबर २०१३ ते मार्च २०१४ अखेर देणेत आलेली सर्व देयके उपरोक्त दरसंकेतान्वये भरलेली आहेत. कनिष्ठ अभियंता, पणुंब्रे (वा) यांचे वर्गवारी बदलणेचे पत्राची छायांकित प्रत तसेच मंजुरी आदेश, चाचणी अहवाल, पैसे भरलेली पावती इ.च्या छायांकित प्रती लेखी निवेदनासोबत जोडल्या आहेत.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) महावितरणच्या अधिकाऱ्याने ग्राहकासमवेत प्रत्यक्ष पहाणी करुन विजेचा वापर कोणत्या कारणासाठी होत आहे त्याप्रमाणे वीज आकारणी करणेबाबत आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

ग्राहकाने दिलेल्या अर्जानुसार वि.प.ने खाजगी पाणी पुरवठा म्हणून ग्राहकास विद्युत पुरवठा केला आहे. हे जरी खरे असले तरी ग्राहक नक्की कोणत्या कारणासाठी विजेचा वापर करीत आहे याची खात्री शाखा अधिकारी, पणुंब्रे यांनी करणे आवश्यक आहे. सदरील दिलेले कनेक्शन हे गावठाण फिडरवरुन दिल्याचे सुनावणी दरम्यान वि.प.तर्फे स्पष्ट करण्यात आले. सदरील ग्राहकास औद्योगिक दराने वीज आकारणी होत असल्याचे सांगितले. परंतु महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या टेरिफ ऑर्डरप्रमाणे ग्राहकाच्या विजेच्या वापरानुसार आकारणी करणे आवश्यक आहे. मा. आयोगाच्या टेरिफ फिलॉसॉफी प्रमाणे औद्योगिक दरसंकेतासाठी औद्योगिक प्रक्रिया असणे आवश्यक आहे. सदर कनेक्शन हे कोणत्याही औद्योगिक प्रक्रियेसाठी दिलेले नाही असे दिसून येते. एकंदरीत ग्राहकाच्या प्रत्यक्ष वापरानुसार खात्री करुनच योग्य त्या दराने वीज आकारणी करणेबाबत आदेश देणे मंचास क्रमप्राप्त वाटते.

शाखा अधिकारी, पणुंब्रे यांनी सदरील कनेक्शन दि. १३.०४.२०१३ रोजी देऊनसुध्दा नवीन जोडणी अहवाल मात्र पत्र क्र. ३३७ दि. ११.१०.२०१३ रोजी उप विभागास सादर केल्याचे दिसून येते. सदर विलंबावरुन शाखा अधिकारी हे ग्राहकाच्या वीज वापराबाबत साशंक होते हे स्पष्ट होते. सुनावणीपूर्वी मंचाकडे येऊन सदस्य सचिव यांच्यासोबत चर्चा केली असता, तक्रारीचे लेखी निवेदन देतेवेळी प्रत्यक्ष पहाणी करुन अहवाल सोबत जोडावा असे सांगितले होते. परंतु वि.प.च्या लेखी निवेदनासोबत असा कोणताही अहवाल जोडलेला नव्हता. तसेच दि. २०.११.२०१४ च्या सुनावणीच्या वेळेस सदर ग्राहकाच्या प्रत्यक्ष वापराबाबत पहाणी करुन मंचास कळविण्याबाबत सूचित केले होते. परंतु मंचाचे आदेश होईपर्यंत या बाबत कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. तसेच अंतर्गत कक्ष, सांगली यांनी दि. ०७.०४.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. एकंदरीत वि.प.चे अधिकारी या बाबत उदासीन असल्याचे मंचाचे स्पष्ट मत झाले आहे. ग्राहकास शेतीपंपासाठीच कनेक्शनची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी अर्ज केलेला असावा. ग्राहकास अेजी फिडरवरुन कनेक्शन देता येत नाही या सबबीखाली ग्राहकाकडून खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी अर्ज लिहून घेतल्याचे दिसून येते. ही बाब दूर्लक्षून चालणार नाही. कंपनीच्या नियमाप्रमाणे गावठाण फिडरवरुन शेतीपंपाचे कनेक्शन देता येत नाही. ही बाब वि.प.च्या अधिकाऱ्याने सुनावणी दरम्यान स्पष्ट केली नाही. **म्हणून प्रश्न क्र. १ चे उत्तर ' होकारार्थी '** देण्यात आले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचा दि. ०४.०७.२०१४ चा आदेश कायम करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने प्रत्यक्ष पहाणी करुन ग्राहकाच्या वीज वापराप्रमाणे विद्युत देयकाची आकारणी करणेत यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (जी. बी. पानकर)

सदस्य सचिव

बी.जी. पवार, अध्यक्ष .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.